REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2022

# "शांततेसाठी शिक्षण व शिक्षकाची भूमीका"

डॉ. कृष्णा पुंजाराम भदाणे
राजर्षी शाहू कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) ताथवडे पुणे.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.

## प्रस्तावना :-



प्रत्येक व्यक्ती जन्मापासुन मरेपर्यन्त शिक्षण घेत असते. शिक्षण ही अखंड चालणारी प्रकिया आहे. प्राचीन काळी वैदिक, इस्लामिक, बौद्ध, जैन, तत्वज्ञानात शिक्षणाविषयीची ध्येय सांगितली आहेत. शिक्षण हे जीवन आहे व जीवन हेच शिक्षण आहे. प्रत्येक व्यक्ती काही ना काही शिकत असतो. यात औपचारीक शिक्षण अनौपचारीक शिक्षण व सहज शिक्षण, यातून अनुभव व निरीक्षणातून व्यक्ती शिक्षण घेत असतो. जस जसा काळ बदलत गेला तस तशी शिक्षणाची संकल्पना ही बदलत गेली व त्यात नविन व आधुनिक शिक्षणाची भर पडलेली दिसून येते. शिक्षण म्हणजे व्यक्तीतील बदल किंवा परिवर्तन होय. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. ते शिक्षण आज देण्यात आलेले दिसून येते. शिक्षणातून राष्ट्राची समस्या सोडविली जाते. म्हणून शिक्षणात संशोधनाला प्राधान्य दिले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास साध्य करण्याचे उद्दीष्ट्ये प्राप्त करावयाचे असेल तर शिक्षणाच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे हि-याला पैलु पाडल्यानंतर तो चमकतो त्याप्रमाणे विविधता पुर्ण शिक्षण घेणे आवश्यक आहे. सांस्कृतीक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, चारीज्य संवर्धनासाठी शिक्षण, लोकशाही नागरीकत्वासाठी शिक्षण, राष्ट्रीय एकात्मतेसाठी शिक्षण, कार्य संस्कृतीसाठी शिक्षण, शांततेसाठी शिक्षण या विविध पैलूंच्या आधारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्याला पैलु पाडून सर्वांगीण विकास शिक्षणातून साध्य करता येइल शांततेसाठी शिक्षण हे विश्वसंस्कृतींचे शिक्षण आहे. जागतिक शांतता, बंधुभाव, जिव्हाळा, सतकृत्य, सदाचारासाठी शांततेचे शिक्षण देणे आजच्या २१ व्या शतकात गरजेचे आहे.

## गरज व महत्व :-

प्रत्येक मानवाला, समाजाला, राष्ट्रांना, शांताता ही प्रिय आहे . कारण प्रत्येक मानवाचे जीवन सुखी समाधानी, आनंददायी, उत्साही. सदाचारी, सत्य व परोपकारी होण्यासाठी शांततेचे शिक्षण दिले गेले पाहीजे आधुनिक युगात औद्योगिक कांती व तंत्रज्ञानाचा विकासामुळे मानवाने त्याच्या बुद्धिचातुर्याने . आकाश, पृथ्वी, पाताळ यावर विजय मिळविला आहे. भौतीक सुखाच्या मागे लागून जगातला मानव स्वतःच्या वलस्थानावर लक्ष केंद्रीत करून इतर मानव प्राण्यांवर वर्चस्व प्रस्थपित

करण्यासाठी युध्द ,लढाया, आतंकवाद, दहशतवाद, सामाजिकवाद निर्माण करून मानवा मानवामध्ये संघर्ष निर्माण करीत आहे.

आजपर्यंत तीन जागतिक महायुद्धे या भूमीवर होऊन गेली आहेत. त्यात अणुबॉम्ब व हत्यारांचा वापर केला गेला. त्यात खुप मोठी मानवी हानी झाली भौतीक व मानवी संस्कृती नष्ट झाली. म्हणून जगातील सर्व मानव प्राण्याला मुखी व समाधानी जीवन जगण्यासाठी शांततेच्या शिक्षणाची गरज आहे. टरच विश्वबंधुत्वाची भावना जागतीक स्तरावर दीसुन येइल. व सर्व राष्ट्रे विकसित राष्ट्रे म्हणून उदयास येतील. सर्व मानव प्राण्यांचा उन्नतीच्या व प्रगतीचा मार्ग म्हणजे शांततेचे शिक्षण होय. आणि हे शिक्षण समाजाचा व राष्ट्राच्या महत्वाचा घटक शिक्षकच देऊ शकतो. म्हणून शांतता व शिक्षण यांचा संगम घालण्यासाठी २१ व्या शतकातील शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे

**शांततेसाठी शिक्षणाची उद्दीष्टे:-**

१. राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय शांततेचा शिक्षणातून विकसित राष्ट्र निर्माण करण्यास मदतकरणे

२. राष्ट्राराष्ट्रामध्ये शांततेचा शिक्षणातून शैक्षणिक, सामाजीक, आर्थिक व सामाजिक देवानघेवाण करण्यास मदत करणे.

३. देशांतर्ग व देशाबाहेरील आतंकवाद, दहशतवाद शांततेचा शिक्षणातून कमी करण्यास मदत करणे व वैश्विक शांतता व आनंद निर्माण करणे.

४. राष्ट्राराष्ट्रामध्ये शांततेचा शिक्षणातून सर्वधर्मसमभाव हे मुल्य सजवण्यास मदत करणे.

. राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमात शांततेचा शिक्षणातून विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करण्यास मदत करणे.

- **शांततेचे शिक्षणाची संकल्पना :-**

१. शांततेसाठी शिक्षण म्हणजे शोषणाविरूध्द, जुलमाविरूध्द अहिंसक व न्यायी समाजाच्या निर्मितीसाठी आणि त्याचा चिरंजियासाठी शिक्षण होय. "अनिल कुमार"

२. "शांततेसाठी शिक्षण म्हणजे राष्ट्रांचा संरक्षणाचे शिक्षण होय."जॉन गलंटग"

३. शांततेसाठी शिक्षण म्हणजे विश्वाची संस्कृती टिकवून ठेवणा-या आदर्श मुल्याचे व संस्काराचे शिक्षण होय.

४. शांततेसाठी शिक्षण म्हणजे जगाची औद्योगीक क्रांती तंत्रज्ञान, जागतीकरण व उदारीकरणासाठी शांततेच्या मार्गान दिले जाणारे शिक्षण होय.

. शांततेसाठी शिक्षण म्हणजे देशाचा भौतीक, सामाजीक, सांस्कृतीक व मानवी घटकाचा विकासाठी दिले जाणारे शिक्षण होय.

जगात शांतता नांदावी यासाठी जागतीक स्तरावर युनो ही संघटना कार्य करीत आहे. जगातील काही देश विकसीत आहेत तर काही विकसनशिल आहेत यांचात सामंजस्य निर्माण करण्यासाठी शांततेचा शिक्षणाची आवश्यकता आहे त्यासाठी प्रत्येक देशाचा अभ्यासक्रमातून शिक्षकाने आदर्श मुल्य, संस्कार, आचार विचार, विद्यार्थ्यांना शिकाविणे आजच्या काळाची गरज आहे. परंतू शांततेचे शिक्षण कशासाठी द्यावे? अशांतता जगात का निर्माण होते? याची कारणे शोधून त्यावर उपाय योजना करणे गरजेचे आहे.

**शांततेचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकाची भुमिका :-**

१. सर्वधर्मसमभाव मुल्य रूजवणे.

२. देशातील ध्वजाचा सर्वधर्मियांनी आदर करणे.

३. सांस्कृतीक कार्यक्रमासाठी शाळांमध्ये जागतीक शांततेसाठीचे नाटक पथनाट्ये सादर करणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये सहकार्यवृत्तीची रूजवणूक करणे.

. शाळेच्या भिंत्तीवर सुविचार लिहिणे ते आचरणात व कृतीत आणने.

६. सॅटेलाईट चित्रफिती तसेच 'कारनने द्वारे शांततेचे शिक्षण देणे.

७. देशांतर्गत व अंतरराष्ट्रीय शांतता करार अमलात आणने

. शाळेत वाद-विवाद स्पर्धाद्वारे जागतिक बंधुभाव निर्माण करणे.

९. शाळेत विविध खेळांद्वारे जगाच्या संस्कृतीचा परिचय करून देणे.

१०. शाळेत जीवन जगण्याचे व्यावसायिक शिक्षण देणे.

११. देशाच्या सुरक्षिततेसाठी लष्करी शिक्षण देणे.

१२. शाळेत वस्तूनिष्ठ इतिहास शिकवणे.

१३. शाळेत विश्वबंधुत्वाची रूजवणूक करण्यासाठी सर्वधर्मियांना प्रवेश देणे,

१४. दहशतवाद विरोधी तंत्राचा शोधासाठी शाळेत संशोधन करणे.

१५. जागतीक शांततादिन महाविद्यालयात व शाळांमध्ये माजरा करणे.

१६. शांततेसाठी तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे.

१७. शिक्षणक्षेत्रातील शैक्षणिक चित्रपट निर्माण करून शांततेचे शिक्षण देणे.

१८. शालेय उपक्रमाद्वारे आध्यात्मीक शिक्षण देणे.

१९. शाळेतील विद्यार्थ्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेचे (युनो) कार्य शिकवणे व मुल्य रुजवणे.

२०. संतांच्या कार्याचा अभ्यास विद्यार्थ्यांना देणे.

२१. नैतिक शिक्षणद्वारे शांततेचे शिक्षण शाळेतील विद्याथ्यांना देणे.

२२. शांततेसाठीच्या अभ्यासक्रम तयार करणे व अमलात आणने.

२३. वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यातून शांततेचे शिक्षण देणे.

२४. विद्यापीठ व जागतिक स्तरावर शांततेचे शिक्षण देण्यासाठी संशोधनाला प्रेरणा देणे.

२५. जागतीक शांतता रॅलीचे आयोजन करणे.

वरील सर्व घटकांनुसार शिक्षणातून शांतता निर्माण करणेसाठी शिक्षकाची भुमिका महत्वाची आहे. तरच जागतीक शांतता प्रस्थापीत होऊ शकते. देशादेशांमधील दहशतवादाचे मुळ मानवी मनावर आहे. दहशतवादी मानसीकतेतून दहशतवादी कृत्य घडत असते. म्हणून शिक्षणातून प्रत्येक व्यक्तीच्या मनावरील दहशतवादाचे अवगुंठन शिक्षणाच्या माध्यमातून दुर करून वैश्विक शांतता निर्माण करण्याचे काम शिक्षकांनी केले पाहीजे.